# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २५४ वा ❑ गुरूवार दि.०४ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


**विशेष लेख...**

## शासकीय इस्पितळात सुविधांचा अभाव गंभीर समस्या

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

शासकीय इस्पितळात सुविधांचा अभाव ही एक गंभीर समस्या आहे, ज्यामध्ये डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची कमतरता, अपुरी स्वच्छता, औषधांचा तुटवडा आणि जुन्या पायाभूत सुविधा यांचा समावेश आहे. यामुळे रुग्णांना गर्दी, दीर्घकाळ वाट पाहणे आणि योग्य दर्जाची सेवा न मिळणे यासारख्या अडचणी येतात. शासकीय रुग्णालयांमध्ये आवश्यक सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास, आवश्यक उपकरणांची उपलब्धता आणि कुशल मनुष्यबळ यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

मागील आठवड्यात अकोला येथील सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत राज्यातील शासकीय रुग्णालयातील एक्स-रे व सिटी स्कॅन सेवा ठप्प झाल्याची बातमी समोर आली आहे. अकोला शासकीय रुग्णालयात एक्स-रे आणि सिटी स्कॅन सेवा ठप्प झाल्या आहेत. या सेवांमधील तांत्रिक बिघाडामुळे किंवा उपकरणांच्या देखभालीमुळे या समस्या उद्भवल्या आहेत, ज्यामुळे रुग्णांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

प्रमुख सुविधांच्या अभावामुळे रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.विशेष म्हणजे गोर गरीब रुग्ण शासकीय रुग्णालयाकडेच धाव घेतात.रुग्णालयात रुग्ण दाखल करून घेण्यासून तर रुग्णांना अनेक अडचणी येतात.

अनेक सरकारी इस्पितळात डॉक्टर, परिचारिका आणि इतर कुशल कर्मचाऱ्यांची तीव्र कमतरता आहे.

अनेक शासकीय रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची कमतरता आहे, कारण मनुष्यबळाचा अभाव, ग्रामीण भागातील डॉक्टरांची कमतरता आणि काही वेळा डॉक्टरांचा प्रशासकीय कामांमध्ये समावेश असणे ही प्रमुख कारणे आहेत. या कमतरतेमुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत, त्यांना खाजगी रुग्णालयांमध्ये जावे लागते किंवा त्यांच्यावर उपचार होत नाही.

रुग्णालयांमध्ये स्वच्छता आणि आरोग्याच्या मानकांची कमतरता दिसून येते अनेकदा आवश्यक औषधे आणि वैद्यकीय पुरवठा उपलब्ध नसतो.

पायाभूत सुविधांचा अभाव जाणवतो. इमारतींची दुरवस्था, जुनी उपकरणे आणि विशेष विभागांमध्ये आवश्यक सुविधांचा अभाव असतो.शहरांमधील सरकारी रुग्णालयांमध्ये गर्दी वाढते, कारण दुर्गम भागांतील रुग्णालयांमध्ये सुविधा नसतात.त्यातच सेवांमध्ये विलंब होतो. मनुष्यबळाची आणि सुविधांची कमतरता यामुळे सेवा मिळण्यास विलंब होतो, जो कधीकधी जीवघेणा ठरू शकतो.

अनेक शासकीय रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा जाणवतो. नियोजनाचा अभाव, प्रशासकीय दिरंगाई, पुरवठा साखळीतील समस्या आणि औषध खरेदीतील विलंब आहे. यामुळे रुग्णांना बाहेरून औषधे विकत घ्यावी लागतात, ज्यामुळे त्यांच्या खर्चात वाढ होते आणि उपचारांना विलंब होतो.

औषध पुरवठादारांची देयके शासनाकडे अडकून पडल्यामुळे आणि खरेदी प्रक्रियेत होणाऱ्या दिरंगाईमुळे औषधांची उपलब्धता कमी होते.

पुरवठा साखळीतील समस्या: सक्रिय औषध घटकांसाठी परदेशी पुरवठादारांवर जास्त अवलंबून राहावे लागते, ज्यामुळे भू-राजकीय घटना आणि उत्पादन समस्यांचा परिणाम पुरवठ्यावर होतो.

काही ग्रामीण रुग्णालयांना औषधे आणि इतर आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसतो किंवा उपलब्ध निधीचा योग्य वापर होत नाही.शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत आरोग्य सुविधा मिळण्याच्या आशेने रुग्णांची संख्या वाढते, त्यामुळे औषधांची मागणी वाढते आणि उपलब्धतेवर ताण येतो. काहीवेळा, शासकीय रुग्णालयांमधील सुविधांच्या अभावामुळे रुग्णांना आवश्यक औषधे बाहेरून खरेदी करण्यास सांगितले जाते.

अनेक शासकीय रुग्णालयांमध्ये एमआरआय () सुविधा उपलब्ध नसते, कारण त्यासाठी लागणारी महागडी उपकरणे आणि पायाभूत सुविधा बसवणे हे खर्चिक आणि तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक काम आहे. यामुळे रुग्णांना खाजगी केंद्रांवर जावे लागते, ज्यामुळे त्यांच्यावर आर्थिक भार पडतो.

एमआरआय मशीन अत्यंत महाग असतात आणि त्यांची देखभालही खर्चिक असते.

एमआरआयसाठी विशेष जागा, वीज पुरवठा आणि तांत्रिक कर्मचारी आवश्यक असतात, जे सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उपलब्ध नसतात. काही ठिकाणी एमआरआय सुविधा सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उपलब्ध करून देण्याबाबत सरकारी पातळीवर चर्चा आणि बैठका झाल्या असल्या तरी, प्रत्यक्षात सुविधा उपलब्ध होण्यास वेळ लागतो.


परिणाम: सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना एमआरआय स्कॅनसाठी खाजगी क्लिनिक्समध्ये जावे लागते, जिथे खर्च जास्त असतो.काही ठिकाणी सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एमआरआय आणि सीटी स्कॅनची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी काही योजना राबवल्या जातात.

अनेक शासकीय व प्राथमिक आरोग्य केंद्रात एक्सरे मशीन नाही...ज्या आहेत त्या धूळ खात पडल्या आहेत.अनेकदा एक्सरे मशीन उपलब्ध असूनही, ती चालवणारे प्रशिक्षित तंत्रज्ञ उपलब्ध नसतात, ज्यामुळे विभाग बंद राहतो.

काही ठिकाणी नवीन डिजिटल एक्सरे मशीन उपलब्ध असूनही, एक्सरे फिल्म्स किंवा इतर आवश्यक साहित्याच्या अभावी सेवा देता येत नाही. काही रुग्णालयांमध्ये जुन्या आणि कबाडी स्थितीत असलेल्या एक्सरे मशीनच आहेत, ज्यांची दुरुस्ती होत नाही किंवा त्या बदलल्या जात नाहीत.काही सरकारी रुग्णालयांमध्ये अणू ऊर्जा नियामक मंडळ कडून आवश्यक परवाना किंवा नोंदणी नसल्यामुळे एक्सरे युनिट्स चालवता येत नाहीत.अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये मशीन उपलब्ध नसतात, ज्यामुळे रुग्णांना इतर ठिकाणी जावे लागते.





## वरद दत्त संस्थान राक्षसभूवन येथे दत्तजन्म सोहळा संपन्न

### नानाव्यास महाराजांच्या हस्ते स्मरणीकेचे विमोचन





**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**संजय व्यापारी / राक्षसभूवन :** राक्षसभूवन ता. गेवराई येथे आद्यपीठ वरद दत्त संस्थान तर्फे श्री दत्त जयंती उत्सव सुरु आहे दि. २७ नोव्हेंबर ते ०७ डिसेंबर पर्यंत हा सोहळा असतो या आठ दिवसात घटस्थापना, अभिषेक, नंदादीप दिंडी आरती, गुरुचरीत्र पारायण पाठ, दत्तयाग हवन, दत्तयाग पूर्णहुती दत्त जन्मोत्सव, अन्नपूर्णा माता जोगवा, महापंगत, छबीना मिरवणूक, पारंपारीक पाचसोंग, लळीत, तिर्थ-प्रसाद असा भरगच्च कार्यक्रम असतात. या कार्यक्रमात बीड जिल्ह्यातून व संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो भाविक येतात व या उत्सवाचा लाभ घेतात. या सोहळ्याची स्मरणीका दरवर्षी प्रकाशित करण्यात येते, या स्मरणीकेचे विमोचन वे.शा.संपन्न पंढरीनाथ व्यास यांच्या शुभ हस्ते व प. पु. योगिराज महाराज डोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या स्मरणीकेचे संपादन वरिष्ठ पत्रकार संजय व्यापारी यांनी केले आहे. या कार्यक्रमास व्यासपीठावर संस्थानचे अधिपती ह.भ. प योगीराज महाराज डोळे, संस्थान कुलोपाध्ये, वे.शा.संपन्न नंदकुमार पुराणिक, संजय महाराज डोळे, सचिन महाराज डोळे, अनंत दसरे, संजय व्यापारी, प्रमोद शास्त्री मोरे, अजय देशमुख, विनायकराव कुलकर्णी, सुरेश कुलकर्णी गोपेवाडीकर, शैलेंद्र मुळे, प्रदिप कुलकर्णी, विजय कुलकर्णी, विष्णू जोशी, दीपक जहागीरदार, अभय पाठक दुर्गादास देशमुख, अंबादास देशमुख, संजय विद्यासागर, श्रीपाद व्यास, सुधीर व्यास, किशोर जैन राजेंद्र पुराणे अशोक डाके व भविकांची उपस्थीती लाभली.

या पुस्तिकेत संस्थान च्या कार्याची उपक्रमांची माहिती दिली आहे. विवीध लेख यांनी पुस्तिका दत्त भक्तासाठी खूप पर्वणी ठरत आहे. हा अंक अनुभूती विशेष अंक काढला आहे. कार्यक्रमास दत्तभाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठी हिताची अभिवचने न देणाऱ्या पक्ष वा उमेदवारांना मत न देण्याचे आवाहन - डॉ श्रीपाद जोशी

**मराठी भाषेसमोर असणारी राज्य, केंद्र व प्रामुख्याने स्थानिक पातळीवरील आव्हाने लक्षात घेऊन, पक्षोपक्षांनी पक्षांच्या जाहीरनाम्यात मागितली गेलेली अभिवचने द्यावीत महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी व मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळीतर्फे सर्व राजकीय पक्ष प्रमुख आणि प्रवक्ते यांना पत्र**

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे** – राज्यात होवू घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आप-आपल्या पक्षांचे जाहीरनामे/ वचननामे यातून मराठी भाषा, साहित्य, संस्कृती जतन, संवर्धन या संबंधात,२०१४ पासूनच्या सर्व विधानसभा, लोकसभा निवडणूकांपूर्वी केलेल्या आवाहनाला जो सकारात्मक प्रतिसाद देत अभिवचने दिले गेली होती तशीच ती येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवेळी दिली जावी अशी विनंती मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळ, महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी, वैश्विक मराठी परिवार, यांचे प्रमुख संयोजक, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे पूर्वाध्यक्ष डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी सर्व राजकीय पक्ष प्रमुख आणि प्रवक्ते यांना पाठवलेल्या पत्रात करण्यात आली आहे.

मराठी भाषेसमोर असणारी राज्य, केंद्र व प्रामुख्याने स्थानिक पातळीवरील आव्हाने लक्षात घेऊन, वर्षानुवर्षे प्रलंबित मागण्यांच्या पूर्तीसाठी पक्षांच्या जाहीरनाम्यात अभिवचने न देणाऱ्या पक्षांना/ उमेदवारांना मत न देण्याचे आवाहन देखील केले गेले आहे.

पक्षांनी आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात,

कोणत्याही शाळेतून हिंदी वा तिसरी भाषा सक्ती लादली जाणार नाही याचे अभिवचन, मराठी ही आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान इ.ची सर्व ज्ञानशाखांमधील सर्व स्तरांवरील सर्व विषयांचे अध्ययन, अध्यापन, संशोधन, रोजगार संधी, विकासाच्या संधी इ.ची माध्यम भाषा, ज्ञान भाषा व्हावी, मराठी माध्यमातून सर्व ज्ञान उपलब्ध व्हावे,म्हणून गेल्या नव्वद वर्षांपासून जे अपारंपारिक मराठी विद्यापीठ व्हावे ही मागणी लावून धरली गेली आहे, ते आंतरराष्ट्रीय मराठी विद्यापीठ स्थापले जाईल हे अभिवचन,

राज्य भाषा सल्लागार समितीने सरकारला सादर केलेले मूळ ५६ पानी मराठी भाषा धोरण मराठी भाषा विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे व ते आहे त्या स्वरूपात लागू करण्याचे अभिवचन, पटसंख्येच्या कारणावरून एकही शाळा बंद केली जाणार नाही, समायोजन धोरण रद्द केले जाईल, राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडू दिल्या जाणार नाहीत, बंद पडलेल्या मराठी माध्यमाच्या शाळा पुनः सुरू करून घेतल्या जातील व प्रमाणशीर तत्त्वावर मराठी माध्यमाच्या शाळा प्राधान्याने चालवल्या जातील, त्यातून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाईल अशी अभिवचने, राज्याच्या सांस्कृतिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र राज्य सांस्कृतिक विकास मंडळ तसेच विभागीय सांस्कृतिक विकास मंडळे स्थापली जातील असे अभिवचन, मराठी राजभाषा अधिनियम अंमलबजावणीसाठी प्रत्येक स्तरावर मराठी राजभाषा विभाग स्थापन स्थापन केला जाईल याचे अभिवचन, दहावी पर्यंत मराठी विषय सक्तीच्या कायद्यात दुरुस्ती करून तो बारावी पर्यंत सक्तीचा आणि पुढे पदवीपर्यंत सर्व ज्ञान शाखांमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल असे अभिवचन, मराठी माध्यमाच्या शाळांची दूरवस्था दूर सारून त्यांना संपूर्ण अनुदानित केले जाईल, मराठी भाषा जतन, संवर्धन, वापर करण्यासाठी घटनेच्या अधिकारात आवश्यक ते कायदे केले जातील व शाळांचे इंग्रजीकरण थांबवले जाईल,

**(क्रमशः)**

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-१०७



*आजचा लघुलेख सर्वसामान्य कला रसिकांसाठी जरा हटके असणार आहे, "गुलाबी" रंगा बद्दल किती वाचकांना काय माहिती आहे कल्पना नाही परंतु "गुलाबी" हे नांव किंवा "विशेषनाम" प्रत्येक वाचकाला त्याच्या त्याच्या वैचारिकतेनुसार माहिती असेलच अशी खात्री आहे.*

*"गुलाबी थंडी," "गुलाबी स्वप्न" अशा विशेषणांनी प्रत्येकाच्या आयुष्यात तारुण्याच्या उंबरठ्यावर, सुखावणारे वातावरण अनुभवायला मिळालेले असेल. रंगांची ताकत काय असते, याचा अनुभव "गुलाबी" रंगाकडे पाहिल्यानंतर कळू शकतो. प्रेम, रोमान्स, मृदुलता, आनंद, आल्हाददायक, जिव्हाळा, मुलायम, हळुवार हे व असे शब्द, आपल्या पैकी, अनेकांनी "अनुभवले "असतील. स्त्रीत्वाशी जोडलेला हा रंग आहे. या बद्दल कुणाच्या मनांत संदेह असण्याचं कारण नाही.*

*"गुलाबी" रंगाला, उत्साह आणि आनंदाचे प्रतीक मानले जाते. हा रंग शांत, मृदु आणि प्रेमळ भावना दर्शवितो. ऐतिहासिक काळात, पूर्वी गुलाबी रंग पुरुषत्वाचा आणि शक्तीचा रंग मानला जात असे. याच धाग्याला पकडून या रंगाचा आधुनिक राजकारणातील कांही पुढारी वा नेते मंडळी पोषाखा साठी किंवा पोषाखातील एखादया प्रकारासाठी उपयोग करतांना दिसतात. आता तरुणाईत मुली आणि स्त्रियांशी संबंधित मानला जातो.*

*"वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये गुलाबी रंग छटेचा फार चपखलपणे उपयोग केला जातो. प्रेम आणि रोमान्स; मृदुलता आणि नम्रता; उत्साह आणि आनंद; ऐतिहासिक आणि सामाजिक अशा विविध स्तरावरील भाव भावनांचा 'गुलाबी 'शी संबंध येतो.*

*लाल रंगाचे कोवळं स्वरूप म्हणून "गुलाबी" रंग मानला जातो. लाल रंग आणि पांढरा रंग यांचं यथायोग्य मिश्रण तयार झाल की, गुलाबी रंग व त्याच्या विविध छटा तयार होतात. गुलाबी रंग, गुलाबी फुले, गुलाबी फूल, गुलाबी कपडे, गुलाल अशा विविध प्रकारच्या गुलाबी रंगाने उदय किंवा उगम, अदम्य इच्छाशक्तीच्या भावनांची वृद्धी होते. या रंगाचे सर्वांत म्हणजे, त्या रंगाकडे पाहिल्यावर शरीरातील संप्रेरके (हार्मोन्स) भावनिक बनतात. लग्नानंतरचे किंवा प्रेमाचे सुरुवातीचे कांही दिवस, महिने वा वर्ष जेव्हढे आकर्षक,आनंदी वाटतात (सर्वसामान्य निरिक्षण) "गुलाबी" रंगाच्या वापरामुळे ती आकर्षकता व तो आनंद दीर्घ वर्ष काळ टिकवता येतो.*

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

गाय शेणाचा पव्हटा
सारवणाला घेतला
सडा हिरवा पिवळा
पहाटे अंगणी शोभला ||३७७||

कर, सारव -पोतार
गढी मातीचा सुवास
संत, साधूंची पाऊले
थांबे येवून दारास ||३७८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# ट्युलिप्स आणि रानफुले- जीवनाची दोन प्रतीके




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

मी फुल तृणातील इवले या कवितेत ते फुलंच जणू आपल्याशी बोलतं आहे, आपलं मनोगत व्यक्त करतं आहे. त्याचं म्हणणं जरी सूर्याला उद्देशून असलं तरी ते आपल्यासाठीही आहेच. ते म्हणतं

जरी तुझीया सामर्थ्याने
ढळतील दिशाही दाही
मी फूल तृणातील इवले
उमलणार तरीही नाही.

जगाला प्रकाश आणि जीवन देणारा सूर्य. केवढा तेजस्वी आणि केवढा सामर्थ्यवान ! त्याच्या पराक्रमाने जणू दशदिशा उजळून निघतात. पण त्याचा प्रकाश, त्याचा अंगार, उष्णता माझ्यासारख्या छोट्या, नाजूक गवतफुलाला सोसवणारा नाही. त्यामुळे चराचराला जीवन देणाऱ्या हे भास्करा, तुझ्या तेजाने मी उमलणार नाही. ते फुल पुढे त्याला म्हणते आहे




शक्तीने तुझीया दिपुनी
तुज करतील सारे मुजरे
पण सांग कसे उमलावे
ओठातील गाणे हसरे?
पुढे तेच रानफुलं म्हणते –
रे तुझीया सामर्थ्याने
मी कसे मला विसरावे?
अन रंगांचे गंधांचे
मी गीत कसे गुंफावे ?

मला मान्य आहे की तू अत्यंत सामर्थ्यवान आहेस, शक्तिशाली आहेस, तेजस्वी आहेस पण मला सांग की तुझ्या शक्तीपुढे, सामर्थ्यापुढे मी स्वतःला विसरून जाऊ का ? मी जरी तुझ्यापुढे क्षुद्र असलो तरी माझे स्वत्व मला कसे विसरता येईल ? मला परमेश्वराने, निसर्गाने जी काही शक्ती, सामर्थ्य अन वैशिष्ट्य दिले आहे त्याला मी दृष्टीआड कसे करू ? मी जर तुझ्या शक्तीपुढे नतमस्तक होऊन स्वतःला विसरलो तर निसर्गानं मला बहाल केलेलं रंग अन गंधांचं गीत मी कसं गाऊ शकेन रे ? ही तर माझीच माझ्याशी प्रतारणा होईल ना !

ही कविता खूप काही सांगून जाते. मला वाटतं गवतफुल हे प्रातिनिधिक आहे. आपल्या सर्वसामान्यांच्या भावना ते व्यक्त करतं. त्याचबरोबर नकळत आपल्याला शिकवणही देतं. कोणाच्या मोठेपणापुढे दबून जाऊन उगाचच नतमस्तक होऊ नका, आपलं स्वत्व, स्वाभिमान कोणत्याही परिस्थितीत गहाण ठेवू नका. लहान मुलांमध्ये लहान होऊन मिसळावे लागते. एखादी व्यक्ती कितीही मोठी असली, कोणत्याही अधिकारपदावर असली तरी जोपर्यंत ती स्वतःचा मोठेपणा बाजूला ठेवून त्या बालकांत सहभागी होत नाही, तोपर्यंत मुलं सुद्धा त्यांच्यात खेळणार नाही. आपण मंदिरात जाताना जशी पादत्राणं बाहेर काढून ठेवतो, तसाच आपला मोठेपणाही बाहेर काढून ठेवता यायला हवा, नम्र होता यायला हवे. तुकाराम महाराज म्हणतात, नम्र झाला भूतां, तेणें कोंडिले अनंता.

(क्रमशः)



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# सगुणभजन

ज्योतिर्मय साहित्य


२१ व्या ओवीत समर्थ म्हणतात की मी ज्या कुळात जन्माला आलो त्या कुळाचा कुलस्वामी श्रीराम आहे. तो माझं भरणपोषण करतो. ‘‘आम्ही काय कुणाचे खातो आमचा राम आम्हाला देतो.‘‘या ओळीवरून समर्थांच्या रामभक्तिची कल्पना येते. ‘‘मी फक्त शहाणा ‘‘अशा देहबुध्दीच्या माणसाचा विकास कधीच होत नाही.आपण तर परमार्थ साधत जीवन जगणारी माणसं आहोत.परमार्थ हा अतींद्रिय अनुभवाचा प्रांत आहे. आपल्याला परमार्थ समजत नाही तर आपण तो ज्ञानी पुरूषा कडून समजून घेतला पाहिजे. ज्ञानी लोक जे सांगतील त्या वर विश्वास ठेवला पाहिजे. त्यांना विनाकारण दोष लावून नाना विकल्प मनात आणून आपली श्रध्दा भंग होउ देऊ नये. ‘‘मला सर्व समजते‘‘ ही भावना परमारर्थात अती घातक ठरते. अशा बुद्धीहीन माणसाचे होते काय तर धड ज्ञान नाही धड भक्ति नाही आहे तो केवळ असार होय.थोर पुरूषाच्या ज्ञानी पुरूषशाच्या मनातून उतरणे हीअगदीच दुर्दैवी घटना आहे. राजपदाचा हक्क असणारा एखादाच राजपुत्र आपल्या दुराचाराने तो हक्क गमावून बसतो आणि दुर्दैवी बनतो. मी मोठा आहे मी आत्मज्ञानी असल्याची खुण सतत मिरवत रहाणे हे आत्मज्ञान .नसून देहाभिज्ञान आहे. देहाभिज्ञानाची सुप्त कल्पना त्याच्या अतर्यामी सतत वास करत असते।

श्री रामरायाचे नाव घेऊन कोणतेही कार्य केले तर ते सत्वर होते हा समर्थाचा अनुभव आहे . आपणही समर्थाच्या विचारांने प्रेरणा घेतली आहे तर समर्थ विचार हे आपल्या साठी ब्रम्ह वाक्यचं आहे. जर जगातील सर्व घटना ईश्वर साक्षीने होतात तर कोणत्याही गोष्टीचे कर्तेपण आपल्याकडे घेऊ नये. ‘‘कर्ता राम आहे‘‘

या अनुसंधानाला निरंतर सांभाळावे. कोणत्याही कर्माचे कर्तेपण जो अगदी मनापासून भगवंताकडे सोपवतो त्याच्या जीवनात ईश्वरीसत्ता कल्पनेच्य बाहेरच्या गोष्टी घडवून आणते. कर्ता राम आहे मी कर्ता नाही त्याच्या विचारावर चालणे हे माझे आद्य कर्तव्य आहे आणि ते ईमानाने पार प डणे ह्यातचं सद्गुरूवचन दडलेले आहे यावर विश्वास ठेवला पाहिजे. यालाच ‘‘सगुणनिवेदन‘‘म्हणतात. तर निर्गुणामध्ये त्याच्याशी एकरूप होऊन साधक निर्गुण होऊन जातो. यावेळी समर्थ सगुणनिर्गुणाच्या उपासनेचा भेद समजाऊन सांगतात. देहबुध्दी सुटलेला पुरूष ज्ञानमार्गाचा अधिकारी असतो. अंतर्यामी निर्गुण आत्मस्वरूपाचे अनुसंधा राखतां राखतां तो स्वस्वरूपाशी समरस होऊन जातो. देहबुध्दीचा माणूस उपासनेचा अधिकारी असतो. ‘‘ईश्वर कर्ता आहे‘‘अशी खरी भावना ठेऊन सर्व कामे करीत गेल्याने त्याची वासना क्षीण होत जाते मन आपोआप अंतर्मुख आपण केवळ ईश्वराच्या हातातील बाहुले आहे हे सत्य पटल्यावर विश्वातील ईश्वरनिष्ठांची शक्ति त्याच्या कडून मोठे कार्य करवून घेते.म्हणून मी फक्त कर्ता आहे असे कधीही वागू नका. आता बघत हं मंडळी ‘‘मी कर्ता‘‘म्हणले तर सतत काळजी घ्यावी लागते. मन ऊद्विग्न होते विचार थांबतात.गती खुंटते. याऊलट ‘‘ईश्वर कर्ता आहे‘‘याभावनेमुळे अनंत ईश्वरशक्ति आपल्या पाठीशी ऊभ्या असल्याचे जाणवते. आपल्या कर्मात तेज येत रहाते एकदा का ईश्वराच्या शक्तिचा अनुभव घेतला की यश किर्ती अने भाग्यदायी घटना तुमच्या आयुष्यात घडतातं ईश्वराच्या आशिर्वादाने प्रत्यक्ष सगूणनिर्गुणाचे दर्शन होते.

***

# जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दु:ख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दु:ख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दु:ख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।




# ‘‘नो मोबाईल फोन फोबिया‘‘

ज्योतिर्मय साहित्य

स्मार्टफोनच्या वापराचा संबंध मुलांमध्ये उदासीनता आणि चिंता यासारख्या विध्वंसक भावनिक समस्यांशी जोडला गेला आहे. कोणत्याही निर्बंधाशिवाय सेल येत असल्याची प्रकरणे वाढत आहेत. मोबाइल फोनच्या वापरामुळे तरुणांना अटॅक उपकरणांच्या विचलनामुळे उत्पादकता कमी होऊ शकते आणि कार्यांवर लक्ष केंद्रित करण्यात अडचण येऊ शकते, ज्यामुळे शैक्षणिक आणि वैयक्तिक कामगिरीवर नकारात्मक परिणाम सोशल मीडिया आणि ऑनलाइन परस्परसंवादामुळे चिंता, नैराश्य आणि सामाजिक अलगावची भावना निर्माण होऊ शकते.

पण मग याला पर्याय काय ?

आपल्याला एव्हाना कळून चुकलं आहे की, या पिढीपासून तंत्रज्ञान आपण दूर करू शकत नाही. त्यांच्या हातातून काढून घेऊ शकत नाही. कारण त्यांच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञानवापर आवञ्यक आहे. म्हणजे मग आपण मुलांना फक्त योग्य पद्धतीने तंत्रज्ञानाचा वापर करायला शिकवू शकतो. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे आपल्याला देखील या सर्व तंत्रज्ञानासंदर्भात अपडेटेड राहावं लागेल. मुलांशी त्यांच्या भाषेत बोलण्याकरिता ते वापरत असलेले पॉप्युलर ॲप्स आपल्याला माहिती हवेत. आपणच, मोबाईल आणि टीव्ही यांचा वापर, गरजेपुरता केला पाहिजे. लहान मुले, मोठ्यांचेच अनुकरण करत असतात. जे नियम लहानांनी पाळले पाहिजेत असे वाटत असेल तर, त्याची सुरुवात, प्रथम स्वतः पासून केली पाहिजे. त्यात मोबाईल ही आला. आपणच गरजेपुरता मोबाईल, टीव्ही यांचा वापर केला पाहिजे. तरच आपल्याला, लहान मुलांना, मोबाईल वापरू नका असे सांगण्याचा अधिकार प्राप्त होतो. बोर्ड गेम खेळणे किंवा तुमच्या मुलाला साफसफाई, स्वयंपाक किंवा बागकाम यासारख्या क्रियाकलापांमध्ये गुंतवून ठेवणे तिला स्मार्टफोन पासून दूर ठेवेल. तुमच्या मुलाला संगीत ऐकणे, एखादे वाद्य वाजवणे, वाचन किंवा चित्रकला यासारखे छंद जोपासण्यासाठी प्रोत्साहित करा. तुमच्या मुलांना त्यांचा मोबाईल रात्री ठराविक वेळेपेक्षा जास्त वापरू देऊ नका. मुलाला निसर्गाकडे आकर्षित करा आणि मैदानी खेळांसाठी देखील प्रोत्साहित करू शकता.

पाळीव प्राणी - मुलाला मोबाईल ऐवजी पाळीव प्राणी द्या, जेणेकरून मुले संवाद साधण्यास आणि भावना व्यक्त करण्यास शिकतील.

फोनमध्ये ठेवा लॉक- आजकाल प्रत्येक फोनमध्ये वेगवेगळ्या प्रकारची काही खास फंक्शन्स असतात, जी त्यांना लॉक करता येतात. लहान मुलांना पालकांच्या देखरेखीखाली स्क्रीनचा वापर करायला लावावा त्यांना वयानुरूप अटी घातल्या गेल्या पाहिजेत. सलग तासभर मोबाइल पाहण्यापेक्षा दिवसातून तीन वेळा वीस - वीस मिनि पाहायला देणं, जास्त चांगल.

प्रेम आणि काळजी - मुलांना त्यांच्या पालकांच्या प्रेमाची आणि काळजीची सर्वात जास्त गरज असते. अशा परिस्थितीत तुम्ही मुलासोबत जास्तीत जास्त वेळ घालवणे गरजेचे आहे, यामुळे तुमचे मूल हळूहळू मोबाईल वापरणे बंद करेल. जर तुम्ही स्वतः मोबाईलच्या व्यसनाचा सामना करू शकत नसाल आणि तुमचे प्रियजन तुम्हाला जास्त मदत करू शकतील असे वाटत नसेल तर ची मदत घेण्याची वेळ आली आहे. असे थेरपिस्ट आहेत जे मोबाइल व्यसन थेरपीमध्ये विशेषज्ञ आहेत. ***




# महिनाभर भात सोडल्याने खरंच वजन कमी होते का?

ज्योतिर्मय साहित्य

जर तुम्हाला रोज भात खाण्याची सवय असेल आणि तुम्ही अचानक भात खाणे बंद करता तेव्हा तुमच्या शरीराला त्याच्याशी जुळवून घेण्यास थोडा वेळ लागतो. सुरुवातीचे काही दिवस तुम्हाला जास्त भूक, अशक्तपणा किंवा थोडीशी चिडचिड वाटू शकते. कारण भात तात्काळ ऊर्जा प्रदान करतो आणि जेव्हा ती कमी होते तेव्हा तुमचे शरीर थोडे सुस्त होते. परंतु जसे तुम्ही तुमच्या आहारात इतर धान्ये, जसे की बाजरी, बार्ली, क्विनोआ, गोड बटाटे किंवा मसूर यांचा समावेश करता, तसे तुमचे शरीर हळूहळू जुळवून घेते.

महिनाभर भात सोडल्याने वजन कमी होते का?

भातामध्ये कार्बोहायड्रेट्स भरपूर असतात आणि ते सहज पचतात. जेव्हा तुम्ही भात खाणे टाळता तेव्हा तुमचे शरीर कमी कॅलरीज वापरते, ज्यामुळे वजन कमी होऊ शकते. वजन कमी करू इच्छिणारे

बरेच लोक भाताचे सेवन कमी करतात किंवा आठवड्यातून एकदा किंवा दोनदाच खातात. त्याऐवजी दलिया, ओट्स किंवा बाजरीसारखे पदार्थ खाल्ल्याने तुम्हाला जास्त वेळ पोट भरल्यासारखे राहण्यास आणि भूक कमी होण्यास मदत होते.

रक्तातील साखरेवर काय परिणाम होईल?

पांढरा तांदूळ सहज पचतो आणि त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण जलद वाढते. महिनाभर भात टाळल्याने तुमच्या रक्तातील साखरेची पातळी अधिक स्थिर राहण्यास मदत होऊ शकते. मधुमेह किंवा रक्तातील साखरेची समस्या असलेल्यांसाठी हे विशेषतः फायदेशीर आहे. भात टाळल्याने गोड पदार्थांची इच्छा थोडी कमी होऊ शकते.

पांढऱ्या भाताला ब्राऊन राईस हा पर्याय

काहींना रोजच भात खाण्याची इच्छा होत असेल आणि ती रोखणे शक्य नसेल तर तुम्ही पर्यायी ब्राऊन राईस खाऊ शकता. त्यामुळे तुमची शुगर कंट्रोमध्ये राहू शकते तसेच त्यामुळे वजनही कमी होऊ शकते.

पचनक्रियेत थोडे बदल जाणवू शकतात

काहीजणांना भात खाल्ल्याने पोटाला आराम मिळतो तर काहींसाठी ते गॅस किंवा बद्धकोष्ठतेचे कारण बनू शकते. जेव्हा तुम्ही भात खाणे सोडून देता तेव्हा सुरुवातीला तुम्हाला पोटदुखी किंवा बद्धकोष्ठतेचा अनुभव येऊ शकतो. तथापि, जर तुम्ही भाज्या, फळे आणि संपूर्ण धान्यांचे सेवन वाढवले तर तुमचे पचन लवकर सुधारेल.

उर्जा कमी वाटू शकते.

भात तात्काळ ऊर्जा प्रदान करतो. जेव्हा तुम्ही तो खाणे सोडून देता तेव्हा तुम्हाला सुरुवातीचे काही दिवस थकवा किंवा सुस्ती जाणवू शकते. विशेषतः जर तुम्ही दिवसभर काम करत असाल किंवा व्यायाम करत असाल. तथापि, तुमचे शरीर उर्जेच्या नवीन स्रोतांशी जुळवून घेत असताना, ही कमतरता स्वतःच दूर होईल. हळूहळू, तुमच्या लक्षात येईल की तुमची ऊर्जा जास्त काळ टिकते आणि तुम्हाला वारंवार भूक लागणार नाही.

पोषक तत्वांच्या कमतरतेचा धोका?

भातामध्ये व्हिटॅमिन बी असते, जे शरीराला ऊर्जा निर्माण करण्यास मदत करते. जर तुम्ही बराच काळ भात खाणे टाळले तर तुम्हाला या व्हिटॅमिनची कमतरता निर्माण होऊ शकते. यामुळे थकवा, मूड बदलणे किंवा विचित्र अन्नाची इच्छा होऊ शकते. म्हणून, जेव्हा तुम्ही भात सोडता तेव्हा तुमच्या शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळण्यासाठी पर्याय म्हणून तुम्ही हिरव्या पालेभाज्या, डाळी, अंडी आणि दूध यासारखे पदार्थ तुमच्या आहारात नक्की समाविष्ट करून घ्या.

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९



## लघु बोधकथा

हलकं काम

मंगू झाडू मारत होता. तसं ते काम त्याच्या शेजारी राहात असलेल्या चंगूला हलकं वाटत होतं. तो सारखा तिला चिडवत होता. कारण चंगू सरकारी नोकरदार होता. काळ पालटला. तसा चंगू एका अफरातफरच्या खटल्यात अडकला. त्यात वाटोळं झालं व भीक मागायची पाळी आली. जेव्हा मंगूला हे माहीत झालं, तेव्हा त्यानं त्याला न चिडवता समजावून सांगीतलं की कोणतंही काम हलकं नसतंच. काही दिवसानं चंगूची परिस्थिती पालटली. परंतु आता तो आलेल्या परिस्थितीतून शिकला होता. तो आता कुणाला चिडवीत नव्हता.

बोध-
१) परिस्थिती आपल्याला सगळं शिकवून जात असते. २) कोणतेही काम हलके नसते.

# दत्तजन्मोत्सव माझ्यासाठी विशेष आहे

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

गुरूर ब्रम्हा, गुरूर विष्णू, गुरूर देवो महेश्वरा

गुरूर साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः

दत्तजन्मोत्सवच्या निमित्ताने सर्वांना खूप, खूप शुभेच्छा माझे पहिले गुरू माझे आईबाबा आहेत शाळेत शिक्षण देणारे माझे शिक्षक गुरू आहेत, ज्यांनी समाजासाठी व देशासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहिले ते सर्वं महा विभूती ते, माझे गुरू आहेत, समाजात वावरताना मला वेळोवेळी साथ देणारे व मला मार्गदर्शन करून प्रोत्साहन देणारे तेही माझे गुरू आहेत, पुस्तक व ग्रंथ माझे गुरू आहेत, सीमेवर राहून रात्रंदिवस लढा देणारे सैनिक हेही माझे गुरूच आहेत, तिन्ही ऋतूमध्ये ठामपणे उभे राहून मला शुद्ध प्राणवायू देणारे हिरवेगार झाडे हेही माझे गुरू आहेत त्याच प्रमाणे जिकडे, तिकडे पसरलेला निसर्ग हा सुद्धा माझा गुरूच आहे या, माझ्या सर्वं गुरूंपुढे मी नतमस्तक होते व त्यांना कोटी, कोटी वंदन करते. गुरूची महिमा अपरंपार आहे. असे सारेच जण म्हणत असतात, गुरू शिवाय मार्ग नाही म्हणून होऊन गेलेले थोर महा विभूती आपल्या गुरूंची सुध्दा सदैव महिमा गात होते.त्याच प्रमाणे दत्तगुरूची महिमा सर्वांनाच चांगल्याप्रकारे माहीतच आहे ते नव नाथांचे गुरू आहेत त्यातील पहिले नाथ म्हणजेच श्री मच्छिंद्रनाथ हे दत्ताचे पहिले शिष्य होत व नंतर सर्वं नवनाथ हे, शिष्य झाले. महाराष्ट्रात असलेल्या नवनाथा पैकी श्री मच्छिंद्रनाथ व श्री कानिफनाथ ह्या दोन नाथांच्या पवित्र समाधी स्थळी असलेल्या गडावर जाण्याचे व दर्शन घेण्याचे मला भाग्य लाभले. त्याच प्रमाणे या, पृथ्वीतलावर ती राहणारे अनेक लोक असतात कोणी ईश्वराला मानतात तर कोणी मानत नाही हा ज्यांचा त्यांचा प्रश्न आहे उगाचच कोणाला नाव ठेवणे योग्य नाही. पण, मी मात्र ईश्वराला मानते. त्यांच्या प्रती माझ्या मनामध्ये जास्त नाही पण, थोडीफार श्रध्दा आहे.कारण,माझा जन्म एका आध्यात्मिक कुटुंबामध्ये झालेला आहे त्यामुळे लहानपणापासूनच मी माझ्या कुंटुबात होणारी पूजापाठ बघत आलेली आहे. माझ्या घरी हरिपाठ, रामायण वाचले जायचे सोबतच सकाळ, संध्याकाळ घरात आरती केल्याशिवाय कोणीही जेवण करत नव्हते. कदाचित हेच माझ्यावरती संस्कार पडले असतील...मी, लहान असताना माझ्या आजोबाजवळ बसून ते, जेव्हा हरिपाठ वाचत असत तेव्हा मी आवर्जून हरिपाठ ऐकायची. जेव्हापासून मी लिहायला, वाचायला शिकली तेव्हापासून अभ्यासोबतच व इतर पुस्तकाच्या बरोबरच मी हरिपाठ, रामायण आणि इतर पोथ्या आवडीने वाचायची. मला ते, वाचायला खूप आवडत असे. दत्त जयंती का..? म्हणून माझ्यासाठी विशेष आहे आज थोडक्यात का होईना दत्त जयंतीच्या निमित्ताने लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे.

बरेच दिवसांपासून मला वाटत होते की, आपण ''रामायण'' वाचावं व पूर्ण वाचून झाल्यावर गोर, गरीबांना घरी बोलावून त्यांना दानधर्म करून जेवू घालावं,पाच लोकांचे हात धुवावं हे, माझ्या मनात बरेच दिवसांपासून चालू होते. पण उशीरा का होईना तो, दिवस आणि ती वेळ खूप दिवसांनी आली. त्या, वर्षी आम्ही चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी या गावी तीन वर्षे राहिलो., माझे दोन्ही मुले खूप लहान होते. एक दिवस अचानक माझ्या पतीसोबत बोलताना रामायणाचा विषय माझ्या मुखातून अगदी सहजपणे बाहेर पडला मी माझ्या मनातील रामायण वाचण्याच्या बाबतीत विचार सांगून टाकली. कदाचित ही ईश्वराची कृपाच म्हणावे लागेल.. त्यांनीही होकार दिला आणि खरच योगायोग म्हणावे लागेल चार दिवसांनी येणारा पुढे श्रावण महिना होता. त्याच श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी घरी छोटीशी पूजा मांडली व '' गोस्वामी तुलसीदास'' लिखित रामायण ठेवली. सकाळी, सकाळी रामायण वाचणे होत नव्हते



संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

पण, संध्याकाळी मात्र पाच ते सहा वाजेपर्यंत एक घंटा रोज रामायण वाचत होती. नंतर आरती करून झाल्यावर गोमातेचे पूजन करून तीला नैवेद्य चालल्यावर जेवण करायची. एवढेच नाही तर रात्रो, इतर कोणतेही पुस्तक वाचून झाल्यावर कविता, लेख लिहायची.

''मुखी हरिनाम व हातात काम'' हे दैनंदिन माझे चालूच होते.

खरं सांगायचं म्हटलं तर.. माझ्या जीवनामध्ये असे, बरेच संकटे, अडचणी आले आणि निघूनही गेले, आजही येतात. पण, कुठेतरी वेळोवेळी ईश्वराची मला साथ मिळत होती आणि आजही मिळत आहे. असे, बरेजण म्हणत असतात की, माणूस घडण्यामागे बरेचजणांचा हात असतो पण, कुठेतरी एखादी ती शक्ती असते आपल्याला दिसत नाही पण, मात्र नेहमीच सोबतीला असते. कदाचित हे,खरे असू शकते. कारण, अंधश्रद्धा माझ्या मध्ये मुळातच नाही. पण, स्वतः वरती विश्वास आहे, नित्यनेमाने चालू असलेले प्रयत्न, मेहनत आणि ईश्वरावरती श्रध्दा आहे त्यामुळे थोडेफार तरी का होईना. आज जे काही मी बघत आहे आणि जे, काही लहान, लहान कार्य माझ्या हातून पार पडत आहेत. त्यासाठी अनेकाचे हातभार लागलेले आहेतच तेवढीच ईश्वराची साथ सुध्दा मिळाली आहे असे मी समजते. बरेचदा ऐकण्यात,वाचण्यात आले आहे की, हे सर्वं घडत आहेत. तो ईश्वर कर्ता करविता आहे आपण मात्र निमित्त मात्र आहोत. आपल्याकडून जे काही करवून घेतो ही त्याची इच्छा असते मी, ह्या सर्वं गोष्टींना मानते.असं करता करता दैनंदिन रामायण वाचन सुरू असताना पाच महिने पूर्ण झाले व दुसऱ्या दिवशी मार्गशीर्ष महिन्याला सुरूवात होणार होती.. त्याच महिन्यात सोळा तारखेला ''दत्त जयंती'' सुध्दा होती कदाचित ही सुद्धा ईश्वराची कृपाच म्हणावे लागेल... माझ्या मनातही तेच ठरले होते की, पूर्ण रामायण वाचून झाल्यावर दत्त जयंतीच्या दिवशीच पाच लोकांचा,गोर, गरीबांना बोलावून त्यांना जेवू घालावं हेच ठरले होते. आणि योगायोगाने '' दत्त जयंतीच्या'' दिवशीच माझ्या मनातील विचारांप्रमानेच घडून आले. माझ्या मोहल्यात सर्वं जाती, धर्माचे लोक मिळून, मिसळून राहत होते त्या सर्वं बंधू, भगिणींनी आपल्याच घरचा कार्यक्रम समजून मला खूप मोठे सहकार्य केले, बाहेर गावाहून येणाऱ्या सर्वं पाहुण्यांची व्यवस्था केली दत्तजयंतीचा पूजापाठ झाल्यानंतर महाप्रसादाचा लाभ उपस्थित असलेले सर्वं जणांनी घेतले हा, छोटासा कार्यक्रम अगदी भक्तीमय वातावरणात पार पडला. दत्त जयंतीचा तो दिवस व त्या दिवशी मला आपुलकीने सहकार्य करणाऱ्या सर्वं माझ्या बंधू, भगिणींना मी, माझ्या शेवटच्या क्षणापर्यंत विसरू शकणार नाही. दरवर्षीच येणारी दत्त जयंती ही माझ्यासाठी विशेष आहे म्हणून एक धन्यवाद मी माझ्या जन्मदात्यांचे मानते त्याच बरोबर मला वेळोवेळी आजपर्यंत सहकार्य करणाऱ्याचे सुध्दा धन्यवाद मानते. एक धन्यवाद ह्या निसर्गराचे सुध्दा मानते या पृथ्वीतलावर ती, एवढा सुंदर जन्म देऊन माझ्या हाती ही फ ुकटची नौकरी देऊन मला ही भूमिका पार पाडण्याची जबाबदारी दिल्याबद्दल.


जय दत्तगुरु, जय गुरुदेव




## श्री पद्मनाभ स्वामी मंदिर तिरुव अनंत पुरम

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

चैतन्याचा महासागर असलेला हा बालक मुनी जवळ आला व त्यांना म्हणाला, ''मला तुमच्याजवळ बसू द्या'' त्याच्या चैतन्याच्या प्रभावाने मुनी आनंदीत झाले. आणि त्यांनी त्याला जवळ बसून घेतले. आणि वात्सल्याने त्याच्या पाठीवरून ते हात फिरवू लागले.



हा बालक रोज यायचा. काही वेळ बसून तो बालक निघून जायचा. आणि आता दिवाकर मुनींना त्या बालकाचा लळा लागला. आश्रमात असलेल्या त्रिफळा वृक्षाच्या सावलीत एकदा मुनी जप करीत बसलेले असताना, बालकाने चेष्टा केली. त्याने मुनींच्या पुजा सामग्रीला स्पर्श केला.यामुळे मुनी थोडेसे रागावले व म्हणाले अरे असा स्पर्श करू नकोस. माझी पूजा बिघडेल!बालकाने हसत विचारले ''माझा स्पर्शाने पुजा सामग्री कशी विटाळेल? मी तर तुझ्यासाठीच आलो आहे.'' मुनी त्यावर किंचित कडकपणे बोलले. तेव्हा बालकाचे हास्य थांबले. तो दुखावला व म्हणाला मुनीवर तुम्ही मला ओळखले नाही, जर तुम्हाला माझा स्पर्श नको असेल, तर मी इथून जातो. असे म्हणून बालक धावत गेला व क्षणात अदृश्य झाला. मुनीं बैचेन झाले. ते भिरीभिरी नेत्रांनी सर्वत्र त्याचा शोध घेत होते. त्यांना आता जाणवले की हा बालक कोणी साधारण बालक नसून ते दिव्य लीला मूर्ती भगवान श्रीकृष्ण आहेत. बालक निघून गेल्यानंतर आसमंतात दिव्य तेज प्रकटले आणि एक आकाशवाणी ऐकु आली. हे दिवाकर मुने ,तू ज्याला रागाने दूर केलेस तो मीच नारायण होतो. तुला जरा माझे दर्शन हवे असेल तर मला अनंत वनात शोध. आताचे तिरुव अनंतपूर त्याकाळी केवळ वन होते. व त्या वनास अनंत वन असे संबोधल्या जायचे. दिवाकर मुनी अनंत वनाकडे निघाले. ते घनदाट वन होते. विशाल वृक्ष तिथे होते. तसेच ते असंख्य नागांचे ही निवासस्थान होते. हे वन दिसायला भयभीत करणारे होते तरी पण दिव्य वाटत होते. मुनींच्या प्रवेशा नंतर लगेचच अचानक संपूर्ण वन पवित्र प्रकाशाने उजळले गेले. मुनी वनात प्रवेश करताच त्यांना एका अद्भूत दृश्य दिसले. त्यांच्यासमोर अनंत नागाच्या पाच फण्यावर शयन केलेले भगवान विष्णू प्रगट झाले. तो विग्रह एवढा मोठा होता की, भगवंताचे मुख एका टेकडीवर नाभी दुसऱ्या टेकडीवर तर पाय तिसऱ्या टेकडीवर. इतका विशाल विस्तार त्या विग्रहाचा होता. शांत भावातील भगवंताच्या त्या विग्रहाला पाहून दिवाकर मुनी आनंदीत झाले.

(क्रमशः)

# श्री गुरु देव दत्त

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

श्री गुरु देव दत्त हा दत्त भक्तांचा पवित्र मंत्र जप आहे. यात ''गुरु'' ''देव'' व ''दत्त''

ही तिनही रुपे अंतर्भुत आहेत.

ज्ञानाचा गुरु, रक्षण करणारा देव, आणि सर्व

गुणांचे मुर्तिमंत् उदाहरण म्हणजे दत्त होय.

आता आपण दत्तात्रेयांची सविस्तर माहिती पाहूया.

१) दत्तात्रेय म्हणजे कोण-

दत्तात्रेय हे हिंदू धर्मातील तात्वीक व योग मार्गाचे

अधिष्ठाता देवता म्हणून मानले जाते. ते त्रय मुर्तिचे

म्हणजेच ब्रम्हा विष्णु आणि महेश या तिघांचे एकत्रित स्वरूप आहेत. म्हणून त्यांना ''दत्त'' हे नामाभीदान देण्यात आले. आणि शिवाय ते आत्रेय ऋषी व अनसूया मातेचे पुत्र म्हणून त्यांना ''दत्तात्रेय'' म्हणतात.

२) स्वरुप :- दत्तात्रेयाचे रुप अत्यंत वैशिष्ठ्य पूर्ण आहे.

अ) तीन मुख- ब्रम्हा विष्णु व महेश यांचे प्रतीक.

ब) सहा हात- विविध आयुधांसह.

क) पाठीमागे ४ कुत्रे- चार वेदांचे प्रतीक.

ड) कटी भोवती गाय - पृथ्वी मातेचे रक्षण.

ई) वृक्षाखाली निवांत उभे असलेले रुप - योग, ज्ञान, आणि संन्यास यांचे अधिष्ठान.

३) दत्तात्रेयांचे तत्वज्ञान- दत्तात्रेयांना अवधूत म्हटले जाते. अवधूत म्हणजे जगात असूनही जगाच्या

बंधनापासून मुक्त.

अ) त्यांचे मुख्य तत्वज्ञान- १) प्रकृतीतील प्रत्येक गोष्ट गुरु आहे. २) जग हे गुरु कुल आहे. यावर आधारित

''अवधूत गीता'' व ''त्रिपुरारहस्य'' ही ग्रंथ संपदा आहेत.

४) दत्त उपासनेचे महत्व- १) मानसिक शांती

२) नकारात्मकता दूर होते. ३) गुरु कृपा प्राप्त होते.

४) कर्म बंधन कमी होते. ५) आध्यात्मिक प्रगती गती ने होते.

दत्तात्रेयांचे प्रमुख जप- १) श्री गुरु देव दत्त

२) दत्त दिगंबर श्री अवधूत स्वामी दिगंबर श्री अवधूत ३) दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा. ४) दत्त दिगंबर दत्त दिगंबर ५) ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय. ६) ॐ द्रां दत्तात्रेयाय नम:

दत्तात्रेयांची प्रमुख स्थाने-

गाणगापूर (कर्नाटक), नरसोबाची वाडी जिल्हा

कोल्हापुर, औदुंबर जिल्हा सांगली, पीठापुरम् (आंध्रप्रदेश), गिरनार पर्वत (गुजरात) राक्षसभुवन ता गेवराई जिल्हा बीड.

अवतार :- गुरु चरित्रात उल्लेख केल्या प्रमाणे




दत्ता चे दोन महत्वाचे अवतार आहेत १) श्रीपाद श्री वल्लभ २) नृसिंह सरस्वती

श्री गुरु देव दत्त या जपाचे सविस्तर फायदे



अनंत दसरे
एन ९ हडको, छत्रपती संभाजीनगर
मो. ८९५६८२२६१६

पाहूयात.

हा मंत्र अत्यंत पवित्र, शक्तिशाली व सर्व शुभ करणारा आहे. दत्तात्रेयांचा गुरु तत्वाशी थेट जोडणारा हा मंत्र मानला जातो, या जपाचे फायदे अनेक आहेत.

१) मानसिक शांती व समाधान- हा मंत्र मनातील चिंता, भीती, ताण, उद्वेग कमी करतो, मन स्थिर होते आणि सकारात्मक विचार वाढीस लागतात.

२) नकारात्मक शक्तींचा नाश - परिसरातील नकारात्मकता, बाधा, दुष्ट नजर, अचानक येणारी

अडचण यावर हा जप अत्यंत प्रभावी मानला जातो.

३) पितृ दोष शांती- दत्त उपासना पितृ दोष, कुल

दैवत अडथळे, वंश परंपरागत संकट, नष्ट करण्यासाठी प्रसिद्ध आहे.

''श्री गुरु देव दत्त'' या जपाचा अनेक दत्त भक्त

नित्य पाठ करतात.

४) गुरु कृपा प्राप्ती- जीवनात योग्य मार्गदर्शन,

चांगले सद्गुरु, अंतर्गत ज्ञान, जागृती हे दत्त जपाने

सहज मिळते, फक्त जप साधना मनापासून, श्रद्धापूर्वक, भाव ठेऊन निष्ठेने नियमित केली पाहिजे.

५) कर्म बंधनात निवृत्ती- दत्तात्रेय कर्मबंधन सोडवणारे मानले जातात, हा जप केल्याने जुनी नकारात्मक कर्मे क्षीण होतात, प्रभाव हीन होतात

व त्यामुळे जीवनातील अडथळे दुर होतात.

६) घरातील शांती व सौहार्द- घरात हा जप किंवा दत्त नामस्मरण केल्याने वातावरण शांत प्रसन्न व देवमय होते.

७) ग्रह बाधा व अडथळे दुर होतात - शनी, राहू, केतू किंवा अचानक येणाऱ्या संकटात दत्त जप मोठा आधार देणारा ठरतो.

८) आरोग्य सुधारणा-

मानसिक व शारीरिक दृष्ट्या मनात शांतता स्थिरावल्याने शरिराचे आरोग्य ही सुधारते, मन बुद्दि, प्राण यांचा समतोल साधल्या जातो.

९) अवघड काळात मार्ग काढण्याची शक्ती- जीवनातील कठिण प्रसंग आर्थिक अडचणी, मानसिक संघर्ष या मध्ये दत्त जप सदासर्वदा धैर्य प्रदान करतो.

१०) आध्यात्मिक प्रगती- ध्यान, जप, आणि दत्त नामस्मरण यामुळे अंर्तज्ञान वाढीस लागते, साधनेत प्रगती होते. गुरु कृपा होण्यासाठी जप साधनेची फार मोठी मदत होते. म्हणून जप साधनेत अखंड लिन व्हावे.


११) जप कसा करावा - सकाळी किंवा संध्याकाळी शांत ठिकाणी बसून मन एकाग्र करत जप साधना करावी.'' श्री गुरु देव दत्त '' हा जप किमान १०८ वेळा निष्ठेने करावा, मन शांत ठेऊन हळुवार जप साधना करावी. जितका जास्त जप होईल तितके आध्यात्मिक ज्ञान वाढीस लागेल, निष्ठेने केलेला जप निश्चितच गुरु कृपा प्राप्त करुन देतो. दत्त मुर्ती समोरबसून मुर्ती चे ध्यान करत जप साधना केल्यास ती साधना लवकर फलीत होते. आपल्या मनातील श्रद्धा सर्वात महत्वाची आहे. मनी भाव


असेल तरच देव पावतो अन्यथा ते शक्य नाही हे ध्यानी घ्यावे. दत्त प्रभु आपले कल्याण करो.

अवधूत चिंतन श्री गुरु देव दत्त

'' जय श्री गुरु देव दत्त ''






# निघालो घेऊन दत्ताची पालखी...

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्रातील दत्त संप्रदायाची अध्यात्मिक अधिष्ठान

गुरुर्ब्रह्म गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा
गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः

या भारतीय परंपरेत गुरूला किती महत्त्व आहे हे या संस्कृत सुभाषिता वरुन स्पष्ट होते.

गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः

हा भाव अत्यंत महत्त्वाचा आहे विशेषत: गुरुचरित्रातील अध्यात्मिक चिंतनाचा गुरु हाच आत्मा आहे, ही गोष्ट दत्त संप्रदायाने सिद्ध केली आणि आचार्यांचे समाजातील स्थान उंचावण्याचा प्रयत्न केला.


सबंध देशामधील हिंदू धर्म संप्रदायामध्ये महाराष्ट्रातील दत्त संप्रदायाची स्वतंत्र वैशिष्ट्ये आहेत. या दत्त संप्रदायाची आध्यात्मिक बैठक लक्षात घेता असे दिसते की श्री गुरुदेव दत्त हे ब्रह्मा विष्णू आणि महेश या तिन्हींचे एकत्रित रूप मानले जातात. शिवाय त्यांना आध्यात्मिक परंपरेनुसार अत्री ऋषींचे पुत्र मानले जाते, आणि त्यांनी महाराष्ट्रात घडविलेल्या अध्यात्मिक जागरणाचे वेगळेपण लक्षात घेण्यासारखे आहे. सामाजिक सांस्कृतिक आणि अध्यात्मिक जागृतीमध्ये या पंथांच्या रचना व कार्यपद्धतीचे इथे स्वतंत्र दृष्टीने आकलन केले आहे.

गुरुचरित्राचे समाजशास्त्र

श्री टेंबे स्वामी उर्फ वासुदेवानंद सरस्वती यांनी मध्ययुगात श्री गुरुचरित्र नावाचा ग्रंथ लिहिला. आणि या ग्रंथातील तत्त्वज्ञानाचे आचरण आणि प्रसारण मध्ययुगात अत्यंत गतीने झाले आणि त्यामुळे हा नवा सांस्कृतिक विचार एक नवी जाणीव निर्मिती करणारा ठरला. सेतू माधवराव पगडी यांनी श्री गुरुचरित्रातील समाज दर्शन हा लेख लिहिला, आणि त्यांनी सुलतानशाहीच्या काळातील मराठवाडा व विदर्भाच्या परिसरातील सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे चित्र रेखाटले. गाणगापूर येथे अमरजा नदीच्या काठी कडगंजी गावानजीक टेंबे स्वामींनी हा ग्रंथरचला तसे टेंबे स्वामी मूळचे विदर्भाचे आहेत. पण त्यांनी मराठवाडा आणि कर्नाटकाच्या सीमेवर अनेक ठिकाणी संचार केला तसेच देशभर ही त्यांचा सरळ दूरसंचार होता कानपूर येथेही त्यांनी एक आश्रम स्थापन केला होता. असे म्हटले जाते टेंबे स्वामींच्या गुरुचरित्रातील अध्यात्मिक चिंतन एवढे महत्त्वाचे आहे, की मराठवाडा व विदर्भातील अनेक कुटुंबातून गुरुचरित्र चौदाव्या शतकापासून अगदी आज पर्यंत नेमाने वाचले जाते. त्याची पारायण केले जातात. आणि त्यासाठी वृत्तवैकल्य पाळली जातात. श्री गुरुचरित्रात महाराष्ट्र धर्म ही कल्पना सुद्धा मांडली आहे. वर्तमान हिंदुत्वाची बीजे ही महाराष्ट्र धर्मात सापडतात. विका राजवाडे यांच्या मते महाराष्ट्रधर्म ही कल्पना गुरुचरित्रापासून सुरू होते. आणि ती समर्थ रामदासांच्या दासबोध ग्रंथापर्यंत येऊन थांबते. अशाप्रकारे महाराष्ट्रधर्म हे एक सांस्कृतिक संचित आहे आणि त्याचा प्रारंभ दत्त संप्रदायापासून होतो ही गोष्ट मोठी लक्षणीय आहे.

अभ्यासाची नवी समीकरणे

महाराष्ट्रातील दत्त संप्रदायाच्या आध्यात्मिक अधिष्ठानाची नवी समीकरणे लक्षात घेता असे दिसते की रमो भुसारी यांनी महाराष्ट्रातील पंथांचा जो अभ्यास केला. त्यात दत्त संप्रदाय हा एक महत्त्वाचा पंथ आहे. खरं तर दत्त संप्रदायाचे प्रतिबिंब एका बाजूला



चक्रधर स्वामींच्या महानुभाव पंथांमध्ये उमटते. तर दुसरीकडे हे प्रतिबिंब वारकरी संप्रदायांमध्ये सुद्धा उमटते. एक गोष्ट लक्षणीय अशी आहे की या दोन्ही पंथांनी परंपरा आणि चक्रधरांनी तर दत्त कवच नावाचे संस्कृत काव्य लिहिले आहे. तसेच त्यांच्या लीळाचरित्रात सुद्धा दत्त पंथाचा अविष्कार दिसतो. स्वतः चक्रधर हे श्रीकृष्णाचा अवतार समजत असत. आणि त्यांच्या लीळांचे जे वर्णन त्यात आले आहे ते मोठे अद्भुत आणि लक्षणीय आहे. गुरुचरित्रातील महाराष्ट्र धर्म कल्पनेचे समतुल्य स्वरूप हे महाराष्ट्रातील बहुतेक सर्व पंथांमध्ये प्रामुख्याने



प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर

लक्षणे दृष्टीने पाळले जाते. आणखी एक मुद्दा म्हणजे गुरुचरित्र या पोथीच्या रचनेचा एवढा प्रभाव पडला की पुढे त्यातून दासगणू महाराजांनी साई चरित्र लिहिले आणि त्यांनी गजानन महाराजांचे चरित्र सुद्धा लिहिले. या दोघांच्या रचनेवर गुरुचरित्राचा विलक्षण प्रभाव दिसून येतो.

मौलिक ऋणानुबंध

श्री गुरुचरित्राचे आणखी एक महत्त्वाचे सूत्र असे आहे की या गाणगापूर येथील हा दत्त संप्रदाय पुढे अक्कलकोट जिल्हा सोलापूर तसेच कोल्हापूर आंध्र प्रदेश इथपर्यंत पोहोचला. आणि आज अक्कलकोट, गाणगापूर, कोल्हापूर ही तीर्थस्थळे दत्त संप्रदायात महत्त्वाची मानली जातात स्वामी समर्थांच्या अक्कलकोट येथील वास्तव्यात त्यांच्यावर लिहिल्या गेलेल्या चरित्रांचा आणि रचनांचा अभ्यास केला असता या सर्व संतांवर दत्त संप्रदायाचा प्रभाव दिसून येतो. आणखी एक सूत्र असे की शिर्डी येथील साई बाबांचे चरित्र जे दासगणूने लिहिले आहे त्यामध्ये सुद्धा श्री गुरुचरित्राच्या विचारांचा प्रभाव दिसतो श्री गजानन महाराज शेगाव यांच्या ऐतिहासिक कार्यावर सुद्धा दत्त संप्रदायाचा प्रभाव दिसून येतो. याचा अर्थ असा की गाणगापूर येथून सुरू झालेली दत्त संप्रदायाची यात्रा ही पुढे अक्कलकोट आणि कोल्हापूरपर्यंत पोहोचते. आणि तसेच ती शेगाव आणि शिर्डी येथे पर्यंत पोहोचते. म्हणजे महाराष्ट्रात घरोघरी लोकप्रिय झालेल्या देशात आणि जगात पोहोचलेल्या संत श्रेष्ठ साई महाराजांच्या कार्यावर सुद्धा दत्त संप्रदायाचा प्रभाव असल्याचे दिसून येते. तसेच लोकमान्य टिळकांच्या बरोबर राष्ट्रीय जागृतीचे कार्य करणारे गजानन महाराज हे सुद्धा दत्त संप्रदायाच्या विचारामुळे प्रभावित झालेले होते, लोकमान्य टिळक आणि गजानन महाराजांची एक सभा वाशिम जिल्ह्यात झाली आणि त्यांनी राष्ट्रीय कार्याचा श्री गणेशा केला याचा अर्थ असा होतो की दत्त संप्रदायातून जी आध्यात्मिक चळवळ सुरू झाली त्या चळवळीचे रूपांतर राष्ट्रीय चळवळीत झाले, आणि पुढे आता त्या चळवळीला आधार देण्याचे काम आधुनिक नव हिंदुत्व चळवळ करत आहे. नव हिंदुत्वातील सामाजिक समरसतेचा विचार हा अनेक अंगानी स्वातंत्र्य समता आणि बंधुता या संविधानातील श्रेष्ठ मानवी मूल्यांची जवळीक साधणार आहे. यावरून आपणास दत्त संप्रदायाच्या सामाजिक कार्याचे महत्त्व लक्षात येते. प्राध्यापक गंगाधर पानतावणे यांनी लिहिलेल्या पत्रकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथांमध्ये डॉक्टर आंबेडकरांच्या जीवनावर दत्त संप्रदायाचा कसा प्रभाव पडला याबद्दल त्यांनी विवेचन केले आहे व त्यासाठी संदर्भही दिले आहेत तेव्हा दत्तसंप्रदाय हा कालबाह्य सनातनी विचार नसून तो आधुनिक प्रगतिशील विचार आहे ही गोष्ट सुद्धा लक्षात घेण्यासारखी आहे. वैज्ञानिक दृष्टीने विचार करता आपणास कुठल्याही संप्रदायाचे मूल्यमापन करताना त्याची सामाजिक फलसृती काय हे लक्षात घेतले पाहिजे. दत्त संप्रदायाने दक्षिण भारतातील आणि पश्चिम भारतातील मानवी समाजाचे नैतिक मूल्य रक्षण करण्यासाठी महत्त्वाचा विचार प्रवाह विकसित केला आहे जेव्हा परकीयांचे आक्रमण तीव्र होते, अशा सुलतानशाहीच्या मुघल आक्रमक यांच्या काळात पश्चिम भारतातील लोकांच्या हिंदुत्व जाणीव टिकविण्याचे वाढविण्याचे आणि जोपासण्याचे कार्य दत्त संप्रदायाने केले आहेत. ही गोष्ट लक्षणीय म्हटली पाहिजे.

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की महाराष्ट्रातील दत्त संप्रदायांचे अध्यात्मिक अधिष्ठान हे अशा प्रकारे हिंदू त्रिमूर्ती ब्रम्हा विष्णू आणि महेश यांना जोडणारे आहे. दत्त हे अत्रि ऋषींचे पुत्र मानले जातात आणि त्यांच्यामध्ये तीनही हिंदू देवतांचे म्हणजे ब्रह्मा विष्णू महेश या त्रिमूर्तींचे एकत्र रूप अविष्करत होते अशी कल्पना आहे. दत्तात्रय हे मानवी जीवनाला सर्व संकटातून कशाप्रकारे मुक्त करतात याबद्दलचा विचार हा तत्कालीन समाजाला नैतिक आधार देणारा ठरला. त्यामुळे स्वामी समर्थांचे चरित्र असो किंवा त्यांचा अक्कलकोट कोल्हापूर आणि गाणगापूर येथील संचार असो किंवा साई महाराजांनी घडविलेले चमत्कार असो किंवा शेगाव येथील गजानन मंदिरातील विविध आख्यायिका व कथा असो, या सर्वांचा संबंध हा थेट दत्त संप्रदायाशी येतो. त्यामुळे असे दिसते की टेंबे स्वामी यांच्यापासून ते गजानन महाराज साई महाराज यांच्यापर्यंत अध्यात्मिक जागरणाला एक नवा सामाजिक अर्थ व सामाजिक संदर्भ प्राप्त करून देण्याचे कार्य महाराष्ट्रातील दत्त संप्रदायाने केले आहे ही गोष्ट विशेषत्वाने नमूद केले पाहिजे किंबहुना अशा प्रकारची व्यापक बहुआयामी सामाजिक समरसता हीच दत्त संप्रदायाच्या कार्याची खरी फलश्रुती होय असे म्हणावे लागेल.


अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त

# विठू हा लेकूरवाळा...

**ज्योतिर्मय साहित्य**

विठू आहे लेकूरवाळा  संगे भक्तांचा गोतावळा

किती छान वाटतंय ! माझे वारकरी भक्त माझ्या भेटीसाठी गावागावांतून पंढरीत या चंद्रभागेच्या तीरावर तंबू ठोकून राहणार आहेत. गेल्या पंधरा दिवसापासून अनवाणी पायाने पुरुषभक्त भगव्या पताका, झेंडे खांद्यावर सावरत आणि भक्तस्त्रियां तुळशीचे वृंदावन डोईवर घेऊन चालत येत आहेत. येताना माझ्या संतभक्त ज्ञानोबा, तुकोबांनाही भेटून आले आहेत. पांढरा सदरा, पायजमा किंवा धोतर आणि डोईवर पांढरी गांधी टोपी किंवा पागोटे घालून टाळ चिपळ्यांच्या निनादात ते मार्ग आक्रमित आहेत. माझ्या भेटीची ओढ अनावर होवून माझ्या पायांवर दंडवत घालणार आहेत. मी त्यांचा सावळा विठू भक्तीचा भोळा आहे. त्यांची निरिच्छ, निरागस भक्ती मला खूप भावते म्हणून मी त्यांना दर्शन देण्यासाठी अठ्ठावीस युगां पासून रुक्मिणीसंगे विटेवर करकटीवर ठेवून उभा आहे. माझे भक्त आनंदाने आपल्या अश्रूचे सिंचन माझ्या पायी करतात.




दूरदूरच्या गावाहून मजल दरमजल करत हे वारकरी भक्त माझे नाम मुखात घेवून नाम्या, तुक्या, नामा एकाने लिहिलेले अभंग, कीर्तन, गवळणी गुणगुणत येत आहेत. आमचे अश्वही त्यांच्या साथीला आहेत. पायी चालून त्यांचे पाय दुखू लागतात. मग मी रात्री ते झोपल्यावर त्यांच्या पायावर प्रेमाने हळुवार फ ुंकर घालतो आणि ते दुसऱ्या दिवशी सकाळी नव्या जोमाने, ऊर्जेने पुन्हा पंढरीची वाट चालू लागतात. ढोल, ताशे, लेझीम, हलगी वाजवत ते सर्वांचे मनोरंजन करत असतात. हातातील टाळ चिपळ्यांसंगे त्यांची पावले भरभर पडत आहेत. त्यांना एकादशीच्या आधीच पंढरी गाठायची आहे. त्यांचा हा सावळा विठू त्यांच्या प्रतिक्षेत आहे. गळ्यात तुळशी माळा अन मधुर असा गळा, गाती अभंग मुखाने जगती जीवन सुखाने असे माझे हे वारकरीभक्त शेतकरी, कामकरी आणि साधेभोळे आहेत.

नको त्यांना पैसा अडका,
नकोय बंगला गाडी
प्रिय त्यांना चंद्रमौळी झोपडी
हवी कशाला माडीवर माडी

अशां शब्दांत ते विठूची गुज करत असतात. त्यांना माझ्या भक्तीची ओढ आहे. माझ्या दर्शनाने त्यांचे डोळे निवून तृप्त होतात. सर्वजण आपला संसार, परिवार सोडून मज भेटीसाठी पंढरीला येऊ लागले आहेत.

“बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल, करावा विठ्ठल, जीवभाव“ अशी त्यांची स्थिती आहे.

वाटेवरच्या मुक्कामावर दानशूर भक्त त्यांना भोजन, पाणी आणि राहण्याची व्यवस्था पुरवत असतात. त्या बदल्यात हे वारकरी गोड गळ्याने अभंगगान करून माझ्या नावाचा जयघोष करतात. “विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल“ हा नादघोष सतत त्यांच्या मुखात घोळत असतो. कपाळावर काळा बुक्का आणि अष्टगंध लावून मोठ्या आनंदाने मिळूनी सारे पंढरीसी येऊ लागले आहेत. वाटेत कितीतरी भक्त त्यांना येऊन मिळतात. सर्वांच्या मुखात एकच जयघोष असतो, “विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल “.त्यांचा विठू डोळ्यांची तोरणे करून त्यांची वाट पाहत आहे. आपल्या भक्ताच्या डोई वरदहस्त ठेवण्यासाठी आतुरला आहे.



सौ भारती सावंत, पालघर

नको भक्ताला गाडीघोडा,  नको त्याला पुरणपोळी

भक्ताला पहायची आहे, विठूची मूर्ती भोळी

विठू आपले दैवत आहे. त्याच्या अंगी माऊलीचे सर्व गुण आहेत. हे भक्त वारकऱ्याला माहित आहे. म्हणून त्या भोळ्या लाडक्या दैवताला डोळे भरून पहावे, त्याचे नाव सदामुखी राहावे म्हणून भक्त चंद्रभागेच्या वाळवंटात आपले बस्तान बसवणार आहे. एकादशीचा उपास करणार आहे. एकदा का विठूचे म्हणजे माझे दर्शन झाले की त्याच्या डोळ्याचे पारणे फिटणार, त्याचा उपास सुटणार आणि माझा भक्त अन्नाचा घास तोंडात घेणार! त्याला माझ्या नामाशिवाय काहीच सुचत नाही. इतका तो माझ्या भक्तीत रममाण, तल्लीन झाला आहे.

अभंग आळवताना भक्त म्हणतात,
रुक्मिणी विठ्ठल । माझीच माऊली ।
सुखाची सावली । हरिनामे ।।

आज संत महंतींनी कितीतरी अभंग, ओव्या, गवळणी लिहून ठेवल्या आहेत. हरिनामाचे अभंग वारकऱ्यांना मुखद्गत आहेत. रोज मंदिरात सायंकाळी माझ्या अभंगाचे पारायण करत आपली कामे करत दिवस काढणारा हा भक्त आता मात्र विठूच्या दर्शनासाठी पंढरीची वाट तुडवत आहे. त्याला विठूच्या पायावर आपले मस्तक टेकवायचे आहे. आपले गाऱ्हाणे ऐकवायचे आहे. कीर्तनात नाचून त्याला विठूच्या मूर्तीला भजायचे आहे कारण तो सच्चा भक्त आहे. वारकरी आहे.

दरवर्षी आषाढी, कार्तिकी वारीला तो पंढरीत येत असतो. कीर्तनात गुणगान गात नाचत असतो. हरिनामाचा झेंडा फडकवतो. जयघोष करत असतो. तो थकत नाही, रुसत नाही तर आपल्या लाडक्या दैवताला कधी भेटेल अशी आस घेऊन येत असतो. काही काळापुरता

त्याला घराचा, परिवाराचाही विसर पडतो. आपला देवाधिदेव असणाऱ्या विठूचरणी लीन होताना त्याला दिसत असतात फक्त विठूची पावले आणि तो त्याच नादात इथे “विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल“ चा नादघोष करतो.

तो विठूपुढे, माझ्यापुढे नतमस्तक होतो. माझ्या पावलांना आपल्या अश्रू सिंचनाने भिजवून टाकतो. विठूपुढे तो कोणीच नसतो. नसतो साहेब, नसतो रईस, नसतो साक्षर, नसतो उच्चवर्णीय ! तर तो असतो फक्त वारकरी! विठ्ठलाच्या नावाची काठी नाचवणारा एक सामान्य वारकरी! ज्याला निरपेक्षपणे विठूला न्याहाळायचे आहे, भजायचे आहे, पुजायचे आहे. त्याच्याजवळ हरिनामाचे एकच हुकमी साधन आहे .त्याने तो आपल्या दैवताला आळविणार आहे. तुळशीमाळा गळा चढवून तो विठूला पुजणार आहे. मग विठूने  त्या बदल्यात त्याला काही नाही दिले तरी चालेल, पण दर्शनाची ओढ घेऊन तो वारी करत पंढरीला येतो आहे. रिंगणात फुगडी घालत आहे. चालून चालून थकलेल्या पायांनी तो रिंगणात सुंदररित्या नाचत आहे. पुढे विठूचे अश्व आणि मागे टाळकरी, वारकरी, हलगीवाले, वीणावाले, तुळशी वृंदावन डोईवर घेऊन बाया पळत असतात आणि रिंगण घालत असतात. फुगडी घालत असतात आणि सर्वांचे मनोरंजन करत असतात. मनाला थोडा विरंगुळा घेत असतात.

# मला आलेली अनुभूती

**ज्योतिर्मय साहित्य**

माझी सकाळी सातची शाळा, दररोज साडेचारला जाग येते, म्हणजे येतेच! पहाटेचे सगळे सोपस्कार उरकून मी कर्म पथावर  आरुढ होते! शाळेत पोहोचते, सकाळी सकाळी मुलांचे प्रसन्न हसरे चेहरे माझी सकाळ सुंदर बनवतात! थडथडणारे हात, कुडकुडणारे पाय, रांगोळीच्या ठिपक्याप्रमाणे ओळीत उभे राहून, हात जोडतात. डोळे बंद करून प्रार्थना म्हणतात. “हीच आमुची प्रार्थनाअन् हेच आमचे मागणे, माणसाने माणसाशी माणसासम वागणे“ प्रार्थना ऐकून मन कृतकृत्य होते!




एवढ्या सकाळी नित्य नियमाने मला कधीही कुठल्याही मंदिरात जाता आले नाही, पण मला याची खंत कदापी वाटत नाही, कारण सकाळचे मुलांच्या ओठातून निघणारे प्रार्थनेचे स्वर मला सहजच ईश्वरचरणी नतमस्तक झाल्याची स्वानंदी भावना देऊन जातात ! काही ओळींचा स्वर इतका आर्त असतो की, नकळत डोळ्यांच्या कडा पाणवतात.



सौ. मनोरमा भारत बोराडे

“लाभले आयुष्य जितके ते जगावे चांगले,
पाऊले चाले पुढे,
जे थांबले ते संपले,
घेतला जो श्वास
आता तो पुन्हा लाभणे,!

जीवनाची क्षणभंगुरता एवढ्या सहज आणि सोप्या शब्दात गुरु ठाकूर यांनी चपखलपणे मांडली आहे की चट्टदिशी डोळे पाणावतात, अंगावर सरर कन काटा येतो, आणि दिवसभराची ऊर्जा या ओळी आपल्यात रुजवून जातात! चांगले सदाचारी, सदवर्तनी, सहज, साधे, सुंदर जीवन जगण्याची प्रेरणा देऊन जातात. मिळालेल्या आयुष्याला देवाचा आशीर्वाद, आपले पुण्य कर्म म्हणून स्वीकारावे ही आठवणही देऊन जातात!

“भोवताली दाटला अंधार दुःखाचा जरी,
सूर्य सत्याचा उद्या उगवेल आहे खात्री,
तोवरी देई आम्हाला काजव्यांचे जागणे,“

या ओळी आयुष्याच्या चढउतारांना सुखदुःखांना तोंड देत पुढे पुढे जायचे, लढायचे पण रडायचे नाही, दुःखाच्या अंधाराचा नाश होणारच, अशी शिकवण देऊन जातात. अशी रात्र अजून कोणीही अनुभवली नाही जिच्या उदरात प्रकाशाची पिले वाढली नसतील, नंतर ती सूर्य झाली, सत्याच्या तेजाने तळपणारी,! तोपर्यंत तू, हे ईश्वरा...!आम्हाला काजव्यांचे जागणे दे.!

भावविभोर करणाऱ्या ह्या ओळी वातावरण भारावून टाकतात, रात्रीतून शाळेची निर्जीव झालेली इमारत जणू सजीव होते. सरस्वतीचीच आरती होत आहे असे वाटत राहते. तिचे पाईक तिला आळवत आहेत असे वाटून जाते. सगळीकडे चैतन्य, उत्साह, भरून उरतो! मुले डोळे उघडतात! मी त्यांच्याकडे बघते, त्यांचे डोळे चमकतात, नव्या आशा, स्वप्न, प्रेरणा, उत्साह, आणि आशीर्वाद घेऊन ! आणि मला अनुभूती होते तुझ्या अस्तित्वाची, जणू तू वावरतोस माझ्या भोवताली हे ईश्वरा ,!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559